वाचा:-

1. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम 1967
2. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र.अंनिओ/1005/126/सेवा-4 दि.31/10/2005
3. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी- 2011/प्र.क्र.1064/2011/ 16-ब दिनांक 12/12/2011
4. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रकक्रमांक बीसीसी-2012/प्र.क्र.332/12/16-ब दिनांक 18/5/2013 व दिनांक 30/7/2013
5. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.चापअ1012/प्र.क्र.63/16-अ दि.26/8/2014
6. महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग शासन निर्णय संकीर्ण-5015/प्र.क्र.273/आस्था7 दि.07/01/2016
7. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिमं 1222/प्र.क्र.54/का.13-अ दि.04/05/2022
8. महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.2022/प्र.क्र.11/आस्था-8 दि.21/10/2022
9. महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग शासन निर्णय संकीर्ण 2022/प्र.क्र.11/आस्था-8 दि.15/11/2022
10. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिमं 1222/प्र.क्र.136 /का.13-अ दि.21/11/2022
11. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन निर्णय संकीर्ण 2022/प्र.क्र.11/आस्था-8 दि.15/05/2023
12. जिल्हा परिषद नंदुरबार सरळसेवा पदभरती जाहिरात क्र.01/2023
13. आयबीपीएस कडून प्राप्त निकाल व त्यानुसार मुळकागदपत्र पडताळणी दि.20/03/2024 व दि.03/06/2024
14. जिल्हा निवड समिती, नंदुरबार बैठक दि.29/07/2024 चे मंजूर इतिवृत्त व कनिष्ठसहाय्यक (लिपीक) पदाची दि.29/07/2024 रोजी प्रसिध्द अंतिम निवड व प्रतिक्षा यादी
15. या कार्यालयाकडील नॉन क्रिमीलेअर पडताळणी पत्र क्र.जिपनं/साप्रवि/आस्था-1अ/474/2024 दि.06/09/2024 व क्र.जिपनं/साप्रवि/आस्था-1अ/595/2024 दि.04/12/2024
16. कार्यालयीन टिपणी मंजुर दि. 11 / 06 /2025

---

जिल्हा परिषद नंदुरबार
(सामान्य प्रशासन विभाग)
जा.क्र.जिपनं/साप्रवि/आस्था-1अ/ 230 /2025
नंदुरबार दिनांक: 11 / 06 /2025

आदेश

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय, परिपत्रक व आदेशानुसार जिल्हा परिषद सरळसेवा भरती 2023 अंतर्गत जिल्हा परिषदेतील गट-क मधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून मान्यता दिल्याने जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या खालील पात्र उमेदवारांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सरळसेवेने **जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपीक वर्गीय) श्रेणीमधील कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क** या पदावर सातवा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी **एस-6 : 19900-63200** या वेतन स्तरमध्ये (अधिक नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता व इतर भत्ते) खालील नमुद अटी व शर्तीना अधिन राहून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूककरण्यात येत आहे.

| अक्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराचा सामाजिक प्रवर्ग | निवडीचा सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | श्रीम.अश्विनी रतिलाल पाटील<br>पत्ता- N 53 SF 4 11 8, SARWESHWAR CHAWK, UTTAM NAGAR CIDCO, NASHIK-422009 | इ.मा.व. | इ.मा.व. (महिला) | P S TALODA |

अटी व शर्ती

1. उमेदवाराची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दाखवता अगर नोटीस न देता जिल्हा परिषद सेवेतुन कमीकरण्यात येईल.
2. उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी नियुक्ती आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून 30 (तीस) दिवसाचे आत स्वखर्चाने हजर व्हावे. उमेदवार मुदतीच्या आत त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास त्यांचा नियुक्तीचा हक्क आपोआप संपुष्टात येईल.
3. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी उक्त उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.
4. त्यांना जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना आगाऊ नोटीस द्यावी लागेल व एक महिन्याचे मुळ वेतन ऐवढी रक्कम जिल्हा परिषद फंडात जमा करावी.
5. त्यांना एका पेक्षा अधिक पती-पत्नी असू नये
6. उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहील.

7. त्यांची आंतर जिल्हा बदली बाबत कार्यवाही वेळोवेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रकानुसार करण्यांत येईल.
8. खात्याच्या पूर्व परवानगी शिवाय प्रशिक्षण अगर शिक्षण घेता येणार नाही.
9. संबंधित उमेदवार यांना नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.
10. त्यांनी नेमणुकीच्या ठिकाण बदल बाबत राजकीय अथवा अन्य मार्गाने दडपण आणल्यास नेमणुक आदेश रद्द करण्यात येईल.
11. नियुक्तीचे कार्यालयास हजर होण्यापूर्वी ते अन्यत्र नोकरीकरीत असल्यास त्या पदाचा राजीनामा देणे व सक्षम प्राधिकाऱ्याने राजीनामा स्विकृत केल्याबाबतचे आदेश / पत्र रुजू अहवाला सोबत सादर करणे आवश्यक आहे.
12. उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील तरतूदीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक, नंदुरबार यांचेकडून वैद्यकिय तपासणीअंती पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या अधिनतेने नियुक्ती देण्यांत येत आहे. सदर शारीरीक पात्रतेसंबधी प्रमाणपत्र खाते प्रमुखांकडे/गट विकास अधिकारी यांचेकडेस सादर करावे. वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्रानुसार ते शासकिय सेवेस अपात्र आढळुन आल्यास त्यांची सेवा समाप्त केली जाईल.
13. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मुंबई कडील शासन परिपत्रक दि.26/8/2014 व शासन निर्णय दि.28/08/2017 मधील सुचनेनुसार उमेदवाराचे चारीत्र्य व पुर्व चारीत्र्य पोलीस तपासामध्ये चांगले असल्याचे अटीस अधिन राहुन नियुक्ती देण्यांत येत आहे. संबंधित उमेदवारांनी चारित्र्य पडताळणी केली असलेबाबतचा अहवाल नेमणूक दिलेल्या कार्यालयास सादर करावा. सदर तपासणीत संबंधित उमेदवार दोषी आढळल्यास त्यांची सेवा कुठल्याही टप्यावर समाप्त करण्यांत येईल व याबाबत नेमणूक दिलेल्या कार्यालयाने संबंधितांकडून हमीपत्र भरुन घेणे आवश्यक राहिल.
14. महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम 1967 मधील नियम 6 (5) नुसार उमेदवाराचा सदर पदावर परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असेल. परंतु उमेदवाराचे काम सदर परिविक्षाधीन कालावधीत आवश्यक त्या दर्जाचे नाही असे आढळून आल्यास संबंधित उमेदवाराचा परिविक्षाकाळ वाढविण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.
15. सदर उमेदवारांना शासनाने जिल्हा परिषदेकरीता तसेच जिल्हा परिषदेने तयार केलेले नियम बंधनकारक राहतील याबाबत उमेदवारांस कार्यालय प्रमुखांस रुजु (हजर) होतांना तशा आशयाचे प्रतिज्ञापात्र सादरकरणे बंधनकारक राहील.
16. उमेदवारास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 28 मार्च 2015 आणि शासन परिपत्रके दिनांक 1 जुलै, 2005 मधील नमुद, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 मधील तरतुदचे पालन करणे बंधनकारक राहिल तसेच सदर प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने प्राप्त करुन घ्यावे. सदर नियमानुसार दि.28/03/2005 नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्दकरण्यात येईल.
17. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा हिंदी आणि मराठी विषयात उत्तीर्ण नसल्यास त्यांना शासनाची एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्णहोणे आवश्यक राहील.
18. जि.प.सेवेत असतांना वा रजेच्या मुदतीत कोणत्याही व्यवसाय, धंदा अगर इतरत्र नोकरीकरता येणार नाही.
19. सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी/ नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्यावर व कोणत्याही वेळी रद्दकरण्यात येईल.
20. गट-क मधील उमेदवारास शासन सेवेतील नियुक्तीकरीता शासनाने विहीत केलेले आवश्यक संगणक अर्हता शिक्षण/ परिक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाचे आत उत्तीर्ण होवून सादरकरणे बंधनकारक राहील. सादर न केल्यास उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
21. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.30/05/2023 मधील तरतुदीनुसार माजी सैनिक कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत व 2 संधीत या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि सदर मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा माजी सैनिक कर्मचाऱ्यास विहित मुदतीनंतर टंकलेखन प्रमाणपत्र सादर करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. दोन वर्षाच्या विहित मुदतीनंतर ज्यावेळी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यात येईल त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्यास वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय होईल. तसेच, विलंबाने प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर विलंबाच्या कालावधीतील देय असणाऱ्या वेतनवाढी ह्या टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या दिनांकास काल्पनिकरित्या अनुज्ञेय करण्यात याव्यात. तथापि त्या कालावधीतील वेतन व भत्यांची कोणतीही थकबाकी संबंधित कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असणार नाही.
22. गट-क मधील उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील नियम 8 नुसार शासनाने विहीत केलेली, तसेच वेळोवेळी विहीत करीत अशा विभागीय परिक्षा / भाषा परिक्षा/ प्रशिक्षण अर्हता विहीत संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहील, प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा (सेवा प्रवेशोत्तर परीक्षा ) चार वर्षात व 3 संधीत उत्तीर्णहोणे बंधनकारक आहे.
23. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.वशिअ-1214/प्र.क्र.26/11 मंत्रालय मुंबई दि.2 जुन 2014 व शासन निर्णय क्र.संकीर्ण 5015/प्रक्र273/ आस्था-8 दि.7 जानेवारी 2016 अन्वये नियुक्ती दिनांकापासुन 3 महिन्याच्या कालावधीत त्यांनी स्वत:ची मत्ता दायित्वे या बद्दलची विवरण प्रपत्र-1, प्रपत्र-2 व प्रपत्र-3 मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.
24. सदर आदेश या भरतीचे संदर्भात विभिन्न न्यायालयातील दाखल याचिका/तक्रारींच्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या भविष्यात दिल्या जाणाऱ्या निर्णय व शासन निर्णयाच्या अधिन राहुन देण्यात येत आहे. सदर निर्णय उमेदवारास बंधनकारक राहील.
25. उपरोक्त पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे वेतन व भत्ते नियमित पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली अदा करण्यात येतात, त्या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या मंजुर अनुदानातुन अदा

करण्यात यावेत.

26. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011 16-ब दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व त्यांचा जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती स्वीकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरित रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

27. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.अंनिओ/1005/126/सेवा-4 दि.31/10/2005 मधील निर्णयानुसार उमेदवारास शासन सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्यात आली आहे. मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण/ जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना शासनाचे प्रचलित धोरणानुसार त्यांना लागू होणार नाही. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दि.31/03/2023 नुसार उमेदवाराला विकल्प सादर करावयाचा आहे.

28. उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे असत्य/खोटे आढळून आल्यास नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

29. उमेदवारांच्या सदर नियुक्ती बाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण वाद-विवाद निर्माण झाल्यास मा.न्यायालयाचा अंतिम निर्णय उमेदवारांना बंधनकारक राहील.

30. उमेदवारास नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. तपासणीअंती नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अवैध आढळुन आल्यास त्यांची सेवा समाप्त केली जाईल.

Signed by
Sawan Kumar
Date: 11-06-2025 18:08:02

सावन कुमार (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नंदुरबार

**प्रति,**

**श्रीम.अश्विनी रतिलाल पाटील, पत्ता- N 53 SF 4 11 8, SARWESHWAR CHAWK, UTTAM NAGAR CIDCO,**
**NASHIK-422009**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना-**

1. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद नंदुरबार
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार
3. ------------------------------------------ खातेप्रमुख ,जिल्हा परिषद नंदुरबार / गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------जि.नंदुरबार

2/- आदेशात नमूद अटी व शर्तीनुसार पूर्तता करुन, उमेदवारांची सर्व मुळकागदपत्रांची पडताळणी करुन, रुजू करुन घेवून, हजर अहवाल या कार्यालयाकडे उलट टपालीसादर करावा. सदर उमेदवार विहित मुदतीत हजर न झाल्यास तसेही कळवावे.

सावन कुमार (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नंदुरबार